मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ६६ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून २००६

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## ५० अंकांची नॉन-स्टॉप वाटचाल - यापुढे काय?

१९८१ ते १९९२ या १२ वर्षात 'हितगुज'चे १६ अंक प्रसिद्ध झाले. ऑक्टोबर १९९३ मधील वार्षिक सर्वसाधारण सभेत कुलबांधवांचे संपर्क माध्यम म्हणून हितगुज चालू रहावे व नियमितपणे प्रसिद्ध व्हावे असा सर्वांनीच आग्रह धरला.

त्यानुसार हितगुज संपादनाची जबाबदारी मी स्वीकारली. मार्च १९९४ पासून जून २००६ पर्यंत ५० अंक अखंडितपणे आणि वेळच्या वेळी वाचकांपर्यंत पोचवण्याचे काम कुलबांधवांच्या आर्थिक आणि अन्य सहकार्यामुळे शक्य झाले. प्रतिष्ठान वृत्त, सभासद वृत्त, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व उपक्रम यांची माहिती. प्रासंगिक निवेदने-आवाहने, वाचकांच्या सूचना-प्रतिक्रिया, परस्पर सहकार्यासाठी उपयुक्त माहिती (सहकार्य देणारे व हवे असणारे दोघांचीहि), कर्तृत्ववान कुलबांधवांचा परिचय तसेच कुलबांधवांचे ललित व वैचारिक लेखन अशा तऱ्हेचा मजकूर हितगुजमध्ये देण्याचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला ते वाचकांनीच ठरवावे. मी मात्र व्यक्तिशः समाधानी आहे.

मात्र प्रश्न आहे तो पुढे काय याचा. मानसिक उमेद असली तरी वयाच्या ७३व्या वर्षी अनिवार्यपणे येणाऱ्या शारीरिक मर्यादा दुर्लक्षित करता येत नाहीत. ही जबाबदारी यापुढे फार काळ पेलणे मला शक्य होईल असे वाटत नाही.

आजवर अनेकदा आवाहन करूनहि संपादन कार्यात सहभागी होण्यासाठी कोणी उत्साहाने पुढे आले नाही. मराठ्यांमध्ये लेखन, प्रकाशन, पत्रकारिता या क्षेत्रातले अनेक जाणकार आहेत. त्यांनी ही जबाबदारी घेण्यासाठी संपर्क साधावा असे पुन्हा एकदा - आणि अखेरचे - आवाहन!

पाण्यात पडल्यावरच पोहायला शिकण्याची वेळ येऊ नये म्हणून क्रमाक्रमाने ही जबाबदारी नवीन पिढीकडे संक्रमित व्हावी अशी इच्छा आहे. ती पूर्ण करणे तुमच्याच हातात आहे.

**- लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), मुलुड
संपादक, हितगुज ★★★

## मधुसूदन खांबेटे - बहुआयामी व्यक्तिमत्व

पेशाने इंजिनीअर आणि रॅमसन कंपनीचे संचालक असलेले खांबेटे हे मूलतः संशोधक वृत्तीचे. रेल्वेची सिग्नल यंत्रणा आणि ब्रेक सिस्टीम सुधारणेच्या अनुषंगाने त्यांनी केलेला अभ्यास, संशोधन अत्यंत मोलाचे ठरले.

अर्थव्यवस्थेतील लघुउद्योगाचे स्थान महत्त्वाचे असले तरी विस्कळीतपणे पसरलेल्या लघुउद्योजकांची संघटना बांधून तिचा दरारा निर्माण होईल इतकी शक्तिशाली करण्याचे काम खांबेटे यांनी अत्यंत निष्ठेने व निःस्वार्थीपणे केले. त्यामुळेच 'टिसा' या स्थानिक पातळीवरील आणि 'कोसिआ'सारख्या देश पातळीवरील संस्थांच्या माध्यमातून लघुउद्योजकांचा मोठा आधारस्तंभ सगळ्यांना दिलासा देत आहे. त्यांच्या या कार्याचा ठाणे महापालिकेने 'ठाणे भूषण' पुरस्कार देऊन गौरवही केला.

लघुउद्योगांसोबत 'रक्तदान' हाही त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. त्यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून रक्तदान मोहिमा राबवल्या. ठाणे शहरातील रक्तदात्यांची पहिली सूचीही त्यांनीच तयार केली. 'टिसा' ब्लड बँक त्यांनी उभी केली.

ठाणे शहर प्रवासी संघटना, ठाणे टेलिफोनधारक संघटना स्थापन करण्यातही त्यांनी भरीव योगदान दिले. तसेच उद्योजकता प्रशिक्षणाचा कार्यक्रम दोन दशके 'टिसा'च्या माध्यमातून अव्याहतपणे चालवला.

वक्तृत्व, निर्भीड, स्पष्टवक्ते म्हणून परिचित असलेल्या खांबेटे यांचे अभिनेता, फोटोग्राफर आणि कसलेला खो-खोपटू हे गुण तर आताच्या काळात कोणाला माहितीही नाहीत.

*(प्रेषक - डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर, वडाळा, मुंबई*
*आधार - महाराष्ट्र टाईम्स, २७.५.०६)* ★★★

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**
**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.**
**वेबसाईट : www.marathepratishthan.org**

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत **११ मार्च, ८ एप्रिल आणि १३ मे रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.** पैकी १३ मे च्या सभेचे अध्यक्षस्थानी कार्योपाध्यक्ष रमाकांत माधव विद्वांस होते. कार्याध्यक्ष आनंदराव मधुसूदन रामकृष्ण उर्फ आप्पा खांबेटे यांच्या अमृतमहोत्सवी धार्मिक घरगुती समारंभाला उपस्थित राहण्यासाठी गेल्याने सभेला येऊ शकले नाहीत. या सभेत आप्पा खांबेटे पतिपत्नी, तसेच वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण करणारे विनायक केशव, कार्यकारी मंडळ सदस्य (उपस्थित) व त्यांच्या पत्नी यांचे अभिनदन करून या दोन्ही दांपत्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशा शुभेच्छा सर्व मराठे कुलबांधवांतर्फे व्यक्त करण्यात आल्या.

**वास्तुप्रकल्प**

मराठे प्रतिष्ठानच्या वास्तुप्रकल्पाचे कुलबांधवांकडून स्वागत होत आहे. मात्र निधि संकलन कार्याने अजून वेग घ्यायला हवा. केवळ २०० कुलबांधवांनी प्रत्येकी रु. २५,००० दिले तरी ५० लाखांचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. या योजनेचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी खालील तीन कार्यकारी मंडळ सदस्यांनी स्वीकारली आहे.

१. **रमाकांत माधव विद्वांस,** कार्योपाध्यक्ष, फ्लॅट नं. ३१, गुडविल ॲश्युरन्स बिल्डींग, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई ४०००१६. फोन : २४३०५२६०, २४३२४८४०. सेल : ९८२०२२४०१४

२. **प्रभाकर दामोदर मराठे,** कोषाध्यक्ष, ८/१३, सहकार नगर, वडाळा (प.), मुंबई ४०००३१. फोन : २४१५०८८९. सेल : ९८२०२३२०८२.

३. **हेमंत महादेव मराठे,** २/१८, शिवानंद सोसायटी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. फोन : २६१७७७५७, २६१५२८७४.

कुलबांधवांनी आपला सहभाग तातडीने प्रतिष्ठानकडे पाठवावा असे आवाहन आहे.

**वर्गणी व देणग्या**

मार्च ते मे २००६ या तिमाहीत प्रतिष्ठानकडे जमा झालेल्या सभासद वर्गणी, हितगुज वर्गणी, जाहिराती आणि देणग्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

**अ. आजीव सभासदत्व/हितगुज वर्गणी :**

१. मधुसूदन कृष्णाजी, नेरळ, कर्जत (रु. ३००)

**ब. शिक्षण निधी :**

१. अनंत/वामन/मोरेश्वर मराठे बंधू (रु. ६०००) (आई यशोदा व वडील गोपाळ रामचंद्र यांच्या स्मरणार्थ)

२. विनायक केशव, वरळी (रु. ५०१) (विवाहाच्या ५०व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ)

३. सुधाकर विष्णु, नागांव (रु. २५१) (नातवाच्या मौजीबंधना प्रीत्यर्थ)

**क. हितगुज निधी :**

१. चिंतामण महादेव, लालबाग (रु. १०००) (चुलती सुमती गजानन यांच्या पुण्यस्मरणार्थ)

२. कालिदास बाळकृष्ण, ढवळी, गोवा (रु. ५०००) (मातोश्रींच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त)

**ड. हितगुज जाहिरात :**

१. जे. बी. ॲन्ड सन्स, काळबादेवी (मार्च २००६ - रु. २५००)

२. प्रभाकर दामोदर, वडाळा (मार्च २००६ - रु. ६००)

***

**ती. राधाबाई बाळकृष्ण यांच्या स्मरणार्थ**

**आमच्या मातोश्रींच्या १४ जुलै २००६ रोजी येणाऱ्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त हितगुज वार्तापत्रासाठी रु. ५०००चा धनादेश पाठविला आहे.**

**कालिदास व शशिकांत बाळकृष्ण (पृ.५४१), "श्री", घर क्र. २१०, ढवळी, पो. कवळे, ता. फोंडा, गोवा ४०३ ४०१.**

*१०वी, १२वी, पदविका, पदवी व अन्य परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.*

# सभासद वृत्त

## अमृतमहोत्सवी कुलबांधव

१. **घाटकोपर, मुंबई येथील** कुलबांधव, 'बंगाली आजोबा' **गजानन भास्कर** (पृ.४२७) यांना १२ मार्च २००६ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. हितगुजमध्ये तर ते लिहितातच. वृत्तपत्रांतहि मार्मिक पत्रलेखन करतात. तसेच 'बेस्ट' उपक्रमातील प्रदीर्घ नोकरीतल्या अनुभवांवर आधारित मिस्किल टीका-टिप्पण्यांचा 'बेस्टायन' नावाचा सुमारे तासाभराचा श्रोत्यांना खिळवून ठेवणारा कार्यक्रमहि ते महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अजूनही करीत आहेत.

२. **ठाणे येथील लघुउद्योगांच्या संघटनेचे शिल्पकार** व सर्वेसर्वा **मधुसूदन रामकृष्ण खांबेटे** (पृ.६९५) यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या घरी १३ मे २००६ रोजी घरगुती धार्मिक समारंभ करण्यात आला. ठाण्यातच त्यांच्या पंच्याहत्तरीचा सार्वजनिक जाहीर समारंभ ३० मे रोजी साजरा करण्यात आला.

वरील दोघांहि ज्येष्ठ कुलबांधवांना निरामय दीर्घायुरोग्य लाभो अशा सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा.

## विवाह सुवर्णमहोत्सव

प्रतिष्ठानचे जुने कार्यकर्ते-कार्यवाह व सध्याचे कार्यकारी मंडळाचे सदस्य **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई यांच्या विवाहाला १२ मे २००६ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. ५० वर्षांच्या सफल सहजीवनाबद्दल विनायक व वसुंधरा या पतिपत्नीचे अभिनंदन आणि निरामय भावी आयुष्यासाठी मराठे कुटुंबीयांतर्फे शुभेच्छा.

## ६६व्या वर्षी संगणक शिक्षण

पुण्यातील परुळेकर ट्रस्ट तर्फे ज्येष्ठ नागरिकांना संगणकाचे ज्ञान मिळावे ह्या हेतूने एक कोर्स सुरू केला. **श्रीमती सुनीता सुधाकर गोखले** (कै. गोपाळ व्यंकटेश, पृ.३८९ ह्यांची कन्या) ह्यांनी वयाच्या ६६व्या वर्षी ५८ टक्के गुण मिळवून पूर्ण केला. त्यानिमित्त म. प्र. च्या वतीने सुनीताबाईंचे अभिनंदन!

## मानसन्मान

**शिक्षणासाठी परदेश गमन**

**सौ. पल्लवी सचिन लेले** M.Sc. (पूर्वाश्रमीची पल्लवी चिं. मराठे - पान क्र. ४१) ही गेली तीन वर्षे, के.ई.एम. हॉस्पिटल पुणे, यांच्या वढू येथील संशोधन प्रकल्पात काम करीत आहे. जोहान्सबर्ग, साऊथ आफ्रिका, येथील WITSWATER-SRAND UNIVERSITY (WITS) मध्ये तिची M.Sc - Medicine - Epidemiology, Population based ह्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून, ती ८ फेब्रुवारी २००६ रोजी जोहान्सबर्गला रवाना झाली. ह्या शिक्षणासाठी तिला जागतिक स्तरावर आरोग्य-कार्यक्रम राबवणाऱ्या INDEPTH NETWORK या संस्थेची शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यासाठी के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे यांनी शिफारस केली. शिक्षणक्रम संपवून परत आल्यावर त्यांच्याकडेच काम करायचे आहे.

**सामाजिक बांधिलकी निभावणारी सौ. भाग्यश्री मराठे 'शमा'**

अंधांसाठी काहीतरी कार्य करण्याचा एक आगळा वेगळा मार्ग **नागपूरचे प्रतिष्ठानचे सभासद दत्तात्रेय कृष्णाजी (पृ.३३४) यांच्या पत्नी भाग्यश्री** (बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये अधिकारी) यांनी चोखाळला.

नवरा परगावी नोकरीला. फक्त रविवारी घरी येणार. अशा परिस्थितीत स्वत:ची नोकरी घर-संसार सांभाळून अंधांसाठी काही कार्य करण्याची मनातली इच्छा पूर्ण करण्यासाठी सौ. भाग्यश्री मराठे 'शमा' यांनी आपल्या **कवितांचा संग्रह 'रेतकी दीवारे'** (पृष्ठ संख्या १०७, किंमत रु. ७०) १९९९ मध्ये प्रसिद्ध केला.

त्यानंतर **दुसरा कविता संग्रह मराठीत 'खेळ मांडियेला'** या नावाने जुलै २००५ मध्ये प्रसिद्ध केला. (पृष्ठ संख्या ७४, किंमत रु. ७५). या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नागपूर येथे ब्लाइंड रिलीफ असोसिएशनच्या हॉलमध्ये झाला. या प्रसंगी आपल्या **पहिल्या काव्यसंग्रहाच्या उत्पन्नाची रक्कम रु. २१०० देणगी म्हणून ब्लाइंड रिलीफ असोसिएशनला** देऊन 'शमा' यांनी अंधांसाठी काहीतरी करण्याची आपली इच्छा पूर्णत्वाला नेली.

> **प्रतिसाद**
>
> **केलं की सगळं जमतं!**
>
> मार्च २००६ च्या हितगुज मध्ये 'मराठ्यांचे उद्योग' वाचले. त्यातल्या ४ ओळी लक्षात राहिल्या -
>
> कसं काय जमतं हो?
> जमायचं काय त्यात?
> केलं की सगळं जमतं!
> नाहीतर टाळी सुद्धा वाजत नाही
>
> खरंच आहे हे. माझ्या सौभाग्यवतीने करून दाखवले आहे.
>
> **- दत्तात्रेय कृष्णाजी** (पृ.३३४), नागपूर

असेच आणखी काव्यसंग्रह प्रसिद्ध होवो अशा मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा!

पत्ता: **सौ. भाग्यश्री मराठे**, द्वारका सहनिवास, १०४, शिवाजीनगर, नागपूर ४४० ०१० फोन : ९४२२०२२८७९

**राधिका मराठे C.A. -**

विलेपार्ले येथील सदस्य **वसंत रामकृष्ण यांची मुलगी राधिका** (पृ.९०) ही नोव्हेंबर २००५ मध्ये झालेल्या Chartered Accountancy परीक्षेत ५५% गुण मिळवून C.A. झाली. सध्या ती National Stock Exchange of India (NSE) मध्ये Senior Executive Officer (SEO) म्हणून नोकरी करीत आहे.

राधिकाच्या यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि भावी काळात तिला उज्ज्वल व्यावसायिक यश मिळो अशा सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा. (प्रभाकर मराठे यांजकडून प्राप्त)

**ओंकार गोपाळ I.A.S.**

अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या केंद्रीय

# मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके २००४-२००५

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| **अ. माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १०वी)** | | | | | |
| १. **केतन सुरेश** (१७४) ठाणे | ८६.५३ | ३०० +२५०■ | ३. **स्वप्नील प्रमोद** (३७६) ठाणे | ८४.२६ | २५० +५००★ |
| २. अदिती उल्हास कोथरूड-पुणे | ८१.३३ | २५० | | | |
| **ब. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १२वी)** | | | | | |
| १. **सौरभ प्रफुल्ल चक्रदेव** (७३७) पुणे | ९२.१७ | ५०० +२५०■ | ४. **मृणाल मिलिंद सरवटे** (७३०) विलेपार्ले | ८२.५० | ३०० |
| | | | ५. **गौरी हेमंत परांजपे** (७३०) विलेपार्ले | ८०.३३ | ३०० |
| २. **स्नेहा उदय** (४०५) वेंगुर्ला, सिंधुदुर्ग | ८६.६७ | ३५० | ६. **मृणाल अनिल**(१५६) बदलापूर (पूर्व) | ७०.६६ | ३०० |
| ३. **स्वराली सतीश** (५५३) पुणे | ८६.३३ | ३५० | ७. **अनिल श्रीपाद** (८७) डोंबिवली | ६८.०० | १५० |
| **क. पदवी व पदव्युत्तर परीक्षा** | | | | | |
| १. **अमित गोविंद** (५४१) उसगाव, फोंडा बी.ई. प्रॉडक्शन इंजिनिअरिंग | ७७.३१ | ३५० | ३. **केतकी अनंत** (४००) अंधेरी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा-डाएटिक्स | ७१.२३ | ३५० |
| २. **दीप्ति अनंत** (४००) अंधेरी एम.एम.एस. डिग्री पोस्ट ग्रॅज्युएट | ६४.४२ | ३५० | | | |
| **ड. स्कॉलरशिप परीक्षा (इ. ४थी)** | | | | | |
| १. **श्रेयस शरद** (२१) नालासोपारा | ९२.६६ | १५० +२५०■ | | | |

★ गणेश तांत्रिक पारितोषिक - १०वी नंतर अभियांत्रिकी शिक्षणासाठी प्रवेश

■ १०वी, १२वी व स्कॉलरशिप परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल कै. कुमारी अनिता खांबेटे पारितोषिक

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यंदा महाराष्ट्रातील वीस मुले उत्तीर्ण झाली. यांत कऱ्हाडचा **ओंकार गोपाळ** (पृ.५५३) याने प्रथम प्रयत्नांतच I.A.S. परीक्षा पास होण्याचा मान मिळवला आहे.

सर्व कुलबांधवांतर्फे ओंकारचे अभिनंदन आणि भावी सेवाकाळात लक्षणीय यश मिळो अशा शुभेच्छा.

**गजानन चिंतामण (पृ.१२९) यांच्या परिवारातील वृत्तविशेष**

१) कै. चिंतामण ब. मराठे यांच्या नावावर जी हस्ताक्षर स्पर्धा घेतली त्याचा निकाल मार्च २००६ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्यामध्ये आमच्या खालील व्यक्तींनी विशेष प्रावीण्य दाखवले आहे. (अ) दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस - माझा पुतण्या कु. पुष्कर सतीश (ब) तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस माझा चुलत भाऊ श्री. अरुण मराठे, मिरज (क) प्रोत्साहानपर बक्षीस आमचे जावई डॉ. गिरीश जाखोटिया.

२) माझा चुलत भाऊ **अजित चंद्रकांत यांची मुलगी श्रियाने** फेब्रुवारी २००६ मध्ये दुसऱ्या वर्षात पदार्पण केले. तिचा वाढदिवस अजित यांनी मोठ्या प्रमाणात साजरा केला.

३) माझे काका **श्री. चंद्रकांत बळवंत** यांनी ७५ वर्षात पदार्पण केले. त्यांची पंचाहत्तरी आमच्या घरी दि. ६.५.०६ रोजी साजरी करण्यात आली. वरील कार्यक्रमास चंद्रकांत मराठे यांचे मोठे बंधू सुधाकर यांचा मुलगा मिलिंद आणि जावई निनाद जोशी, तसेच पुतणे सतीश काशिनाथ आणि गिरीश चिंतामणि, रुपी बँक, पुणे हे हजर होते.

४) **सतीश काशिनाथ** (पृ.१२८), अध्यक्ष, युनायटेड वेस्टर्न बँक, सातारा **यांच्या कन्येचा विवाह** (कु. मुग्धा) दि. ३.६.०६ रोजी मुंबईस संपन्न होणार असून सदरचा साखरपुडा दि. ३०.३.०६ रोजी मुंबईस पार पडला. सतीश मराठे यांचे भावी जावई श्री. शेटे नवीन पनवेल येथे आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. (प्रेषक : **गजानन चिंतामणि**, पुणे)

**कुर्यात बटोर्मंगलम्**

१) बेळगांव येथील सभासद **नितीन (बाळकृष्ण) रघुनाथ यांचा मुलगा ओंकार (पृ.५२०)** याचा व्रतबंध ७ मे २००६ रोजी टिळकवाडी, बेळगांव येथे थाटामाटात साजरा झाला.

२) **सुधाकर विष्ण (पृ.५८) नागाव, ता. अलिबाग यांचा नातू अभिषेक** याचा मौजीबंधन समारंभ मार्च २००६ मध्ये संपन्न झाला.

**दोन्ही बटूंना विद्याभ्यासात सुयश लाभो असा मराठे कुटुंबीयांतर्फे आशीर्वाद**

## नांदा सौख्य भरे

१. चौल, ता. अलिबाग येथील कुलबांधव, **सुरेश नारायण विद्वांस यांचे पुत्र नृपेन** (पृ.६६४) यांचा शुभविवाह महाड येथील अनिल गजानन दाते यांची ज्येष्ठ कन्या स्नेहल हिच्याशी १४.१२.२००५ रोजी भांगरवाडी, लोणावळा येथे पार पडला.

२. आडेली येथील **ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चिंतामण रामचंद्र (पृ.४०५) यांचा नातू युवराज** (जयप्रकाश चिंतामण यांचा ज्येष्ठ पुत्र) याचा विवाह गाळेल, सावंतवाडी येथील प्रमोद नारायण अळवणी यांची कन्या डॉ. प्रियाराणी हिच्याशी १ मार्च २००६ रोजी गोविंद नाट्यमंदिर, सावंतवाडी येथे थाटाने साजरा झाला.

३. तिस्क-उसगांव, गोवा येथील सदस्य **गोविंद नारायण यांची कन्या रेणुका उर्फ गंधाली** (पृ.५४१) हिचा विवाह फोंडा, गोवा येथील मिलिंद मुकुंद कुलकर्णी यांचेशी २५.४.०६ रोजी कोल्हापूर येथे थाटामाटात साजरा झाला.

**सर्व नवविवाहितांना सुखी व संपन्न जीवन लाभो अशा मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा**

## सहवेदना

१. प्रतिष्ठानचे सदस्य **श्री. सतीश केशव** (पृ.२७३) ह्यांचे २१ जानेवारी २००६ रोजी वयांच्या ५२व्या वर्षी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. I.I.T चेन्नई येथून B.Tech ही पदवी घेऊन IIM बंगलोर मधून P.G.D.M. ही पदवी घेतली होती. त्यांनी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांतून अनुभव घेऊन प्रसन्न टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स व सूर्यदत्ता इन्स्टिट्यूट मध्ये संचालक म्हणून काम केले होते. टेबल टेनिस व बुद्धिबळ ह्या खेळात त्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले होते. त्यांच्यामागे पत्नी श्रीमती शुभदा व पुत्र शुभातीश हे आहेत.

२. प्रतिष्ठानचे सदस्य **श्री. सुधाकर गजानन** (पृ.३९०) ह्यांचे यकृताच्या कॅन्सरने २ एप्रिल २००६ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी दु:खद निधन झाले. श्री. सुधाकर ह्यांनी नोकरी करून विद्यापीठाची B.A. (ऑनर्स) ही पदवी संपादन केली होती. याशिवाय लोअर डिप्लोमा इन को-ऑपरेशन प्रथम क्रमांक मिळवून प्राप्त केला होता. त्यांचा लघुलिपी वेग १६० शब्द इतका होता. ते रिझर्व्ह बँकेच्या पुणे येथील ट्रेनिंग कॉलेजमधून अधिकारी पदावरून निवृत्त झाले होते. त्यांनी देहदान व नेत्रदान केले. त्यांच्यामागे पत्नी श्रीमती मनीषा व पुत्र चि. मिलिंद व सतीश हे आहेत.

३. नागपूरमधील सदस्य **दत्तात्रय कृष्णाजी (पृ.३६६) यांच्या मातोश्री सौ. सुशिला कृष्णाजी** यांचे जळगाव मुक्कामी २९ मार्च २००६ ला पहाटे १ वा. ४५ मि. नी वयाच्या ८०व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

४. प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य **चिंतामण महादेव (पृ.२२२) यांची चुलती श्रीमती सुमती गजानन** यांचे वयाच्या ८२व्या वर्षी २१.२.०६ रोजी निधन झाले. तिच्या पुण्यस्मरणार्थ चिं. म. यांनी हितगुजच्या खर्चासाठी रु. १००० देणगी दिली आहे.

५. चौल, अलिबाग येथील कुलबांधव **सुरेश नारायण विद्वांस** यांच्या मातोश्री श्रीमती यमुनाबाई नारायण (पृ.६६४) यांचे २५ नोव्हेंबर २००१ रोजी निधन झाले.

६. आडेली येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चिंतामण रामचंद्र (पृ.४०५) यांचे ३१ मार्च २००६ रोजी निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. ते ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच सहकारी सोसायटीचे काही काळ चेअरमन होते.

७. कोल्हापूरातील प्रसाद पूजा सेंटर महाकाली मंदिर दक्षिण दरवाजा येथील सुप्रसिद्ध व्यापारी **अशोक (श्रीपाद) दिनकर** (पृ.२१९) यांचे शुक्रवार दि. २७.१.०६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ होते. महाकाली धर्मशाळेचे अध्यक्ष व मराठे प्रतिष्ठानचे कोल्हापूर प्रतिनिधी नंदकुमार (सदानंद) मराठे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो ही प्रार्थना.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सर्व मराठे परिवार सहभागी आहे.**

***

# तारणाऱ्यापेक्षा मारणारा ठरला श्रेष्ठ

**(श्री. प्रमोद महाजन यांना श्रद्धांजली)**

- **सौ. प्रतिभा सुधाकर** (पृ.१२९) नौपाडा, ठाणे

प्रिय प्रमोदजी,
नका करु काळजी,
मल अगदी वाटतंय स्पष्ट,
मारणाऱ्यापेक्षा तारणारा असतो श्रेष्ठ

अखेर बारा दिवसांच्या लढाईनंतर तुम्ही
सुखदु:खाच्या पार गेलात
आणि आम्ही मात्र दु:खाच्या खाईत नुसते
होरपळून निघतोय...

देवाने आमची आर्त विनवणी ऐकली नाही.
तारणाऱ्यापेक्षा मारणारा ठरला श्रेष्ठ

तुमचं उमदं व्यक्तिमत्त्व पुन्हा दिसणार नाही
तुमचं निर्मळ हास्य आम्हाला सुखावणार नाही
तुमचं अमोघ वक्तृत्व ऐकायला मिळणार नाही
सगळंच संपलंय आता

पण असं होऊन चालणार नाही
तुमचं अजोड कर्तृत्व तुमच्या साऱ्या गुणांसह
पुन्हा कुठेतरी एकवटलं पाहिजे
तुमच्यासारखा नेता महाराष्ट्राला मिळाला पाहिजे

तुमच्या आत्म्याला शांती मिळो
असं म्हणणार नाही,
तुमचा आत्मा अपुरं कार्य करण्यासाठी
पुन्हा येथे अवतरेलही,
पण ते पहायला मी असणार नाही
याचे दु:ख आहे.

***

## मामा मराठे ब्रिज स्पर्धा १८ जून २००६

म. प्र. चे **अध्यक्ष आनंद यशवंत यांच्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त** प्रतिवर्षी मामा मराठे ब्रिज स्पर्धा (Pair Progressive) आयोजित केली जाते.

या वर्षी ही स्पर्धा १८.६.०६ रोजी सकाळी ठीक ९ वाजता सुरू होईल. स्पर्धकांनी आपली नावे त्याच दिवशी सकाळी ८.४० पर्यंत नोंदवावी. पत्ता : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड रोड, खोपट, ठाणे. फोन : २५४७२७७१

# अमृतसर व वाघा बॉर्डर दर्शन

- **मीता यशवंत** (पृ.४४४), पुणे

माझे पति कै. य. ग. हे खडकवासल्याच्या 'राष्ट्रीय प्रबोधिनीत' 'भौतिकशास्त्राचे' व्याख्याते होते. आमची दोन्ही मुले, चि. मनोज व चिन्मय त्याच वातावरणात वाढली. चि. मनोज हा भारतीय वायुसेनेत Mig 27 या लढाऊ विमानाचा वैमानिक आहे. धाकटा मुलगा चि. चिन्मय हा सैन्यदलात Lt Col असून हेलिकॉप्टरचा वैमानिक आहे.

चि. चिन्मय ह्याची बदली पंजाबमधील पटियाला येथे झाल्याचे कळले तेव्हाच मी पंजाबला जाण्याचे निश्चित केले. त्याचे मुख्य कारण म्हणजे आपली भारतीय सीमा 'वाघा बॉर्डर' तेथून जवळच आहे. ती बघण्याची अनिवार इच्छा मनात होती.

चिन्मयने माझे तिकिट काढून पुण्यास पाठविले. १० नोव्हेंबर २००५ ला पुणे सोडले. 'झेलम'ने मनमाड, खंडवा, भोपाळ, ग्वालियर मार्गे दिल्ली गाठली. दिल्लीपुढील प्रवास मात्र त्या प्रत्येक ठिकाणचा इतिहास आठवत केला. 'पानिपत' गेल्यावर इतिहासातील मराठ्यांची पानिपतची युद्धे आठवली. कुरुक्षेत्र आल्यावर महाभारतातील कौरव पांडवांचे युद्ध आठवले. दोन्ही सैन्याच्यामध्ये रथ उभा करून अर्जुनाला 'गीता' सांगणारे भगवान श्रीकृष्ण समोर उभे राहिले. ज्या गीतेने जगाला थक्क करून सोडले त्या पवित्र भूमीतून आपण जात आहोत ह्याचा अभिमान वाटला.

अम्बाला cant आल्यावर वर्तमानकाळात आल्याचे भान आले. समोर सैनिकांची ये-जा चालू होती. 'अम्बाला है, उतरो जल्दी' असा आवाज कानी पडत होता. त्यानंतर आले 'राजपुरा'. मला येथेच उतरायचे होते. चि. चिन्मय मला घ्यायला आला होताच. त्याच्या गाडीने आम्ही अर्ध्या पाऊण तासात घरी पोचलो. पटियाला येथील सैनिक छावण्या बऱ्याच मोठ्या व पसरलेल्या आहेत. तेथेच अधिकाऱ्यांची व सहकाऱ्यांची घरे आहेत. अत्यंत स्वच्छ मोकळा व आनंददायक असा परिसर आहे. पटियाला हे राजघराण्याचे शहर म्हणूनही ओळखले जाते. तेथील इमारती राजघराण्याच्या साक्षी आहेत. पटियाला क्रीडाक्षेत्रासाठीही प्रसिद्ध आहे. जागतिक क्षेत्राचे खेळाडू येथे तयार होतात. येथील भरतकाम केलेल्या चादरी, साड्या, पंजाबी सूट प्रसिद्ध आहेत. त्यांना जागतिक स्तरावर मागणी आहे. ह्या भरतकामास 'फुलकारी' असे म्हणतात.

टॅक्सी करून आम्ही अमृतसर व वाघा बॉर्डरला जायला निघालो. 'पटियाला' पासून हे अंतर सुमारे २५० कि.मी. आहे. जाताना वाटेत संपूर्ण पंजाबचे दर्शन झाले. ग्रँड ट्रक रोडने सर्व प्रवास झाला. रस्त्याच्या दुतर्फा निलगिरीची उंचच उंच झाडे आहेत. त्यामागे पंजाबची संपन्न शेते लांबवर पसरलेली आहेत. शेतांभोवती उभे असणारे ट्रॅक्टर्स, शेतात काम करणारे सरदारजी हे सर्व पंजाबच्या संपन्नतेचे दर्शन घडवतात. वाटेत 'बियास' व 'सतलज' ह्या दोन मोठ्या नद्या व त्यावरील भव्य पूल लागले. पंजाबच्या रावी, झेलम, चिनाब नद्याही आठवल्या. 'पंज आब'ने पंजाबला आबादी आबाद केले आहे.

सायकाळी अमृतसरच्या सुवर्णमंदिरात दाखल झालो. तेथील भव्यता व राजेशाही थाट डोळ्यात भरणारा आहे. सुवर्णपट्ट्यांनी वेष्टित केलेले दरवाजे, विस्तीर्ण आवार, मुख्य मंदिराची विस्तीर्ण वास्तू, त्याच्या भोवतीचे चारही छोटे घुमट सारे नजरेत भरते. मंदिराच्या चारही बाजूस सरोवर आहे. ह्या पवित्र सरोवरात स्नान केल्यास सर्व दुःखे दूर होतात अशी श्रद्धा आहे. कमीत कमी इथे हातपाय तरी धुवावेत.

आम्ही हातपाय धुवून मुख्य वास्तूत प्रवेश केला . गुरुनानक साहेबांचा ग्रंथसाहेब मध्यभागी ठेवला होता. त्याचे 'पठण' चालू होते. गुरुवाणीचे गंभीर स्वर वातावरणात घुमत होते. शीख धर्मीयांव्यतिरिक्त इतर धर्मांचेही बरेच लोक तिथे होते. मंदिरात दर्शन घेऊन आम्ही 'लंगर' मध्ये जेवलो. (भाकरीसारख्या जाड पोळ्या आणि चविष्ट मिक्स उडीद दाल) त्यास 'प्रसादम्' म्हणतात. कडा प्रसाद हा अत्यंत चविष्ट असतो.. (भरपूर तुपात भाजलेला कणकेचा शिरा).

आता आम्हाला 'वाघा बॉर्डर'ला जायचे होते. तासाभराच्या प्रवासानंतर 'वाघा बॉर्डर'ला पोचलो. संपूर्ण कार्यक्रम अंदाजे एक तासाचा असतो. बरोबर ४।। वाजता कार्यक्रम सुरू होतो. आम्ही गेलो त्या दिवशी खूपच गर्दी होती. येथे आत गेटपर्यंत येण्यासाठी पासेस काढावे लागतात. बऱ्याच शाळा आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन आल्या होत्या. इतर दर्शकही खूपच होते. चिन्मय बरोबर असल्याने आम्हाला आतपर्यंत जाता आले. त्याने माझ्यासाठी पुढील क्रमांकाची आसन व्यवस्था ठेवली होती, त्यामुळे सर्व कार्यक्रम उत्तम रितीने पाहता आला. सगळीकडे अत्यंत कडक अनुशासन व कडक युनिफॉर्ममध्ये फिरणारे अधिकारी दिसत होते. घोषणा देणारे आवेशपूर्ण दर्शक, विरश्रीयुक्त गाणी, सारे वातावरण भारावलेले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर देशप्रेम झळकत होते.

दोन्ही बाजूस शेतांमध्ये भारत पाकिस्तानच्या सीमा तारेने बंदिस्त केलेल्या होत्या. प्रत्येक ठिकाणी कुंपणाजवळ सैनिक शस्त्रासह उभे होते. BSF चे घोडेस्वारही होते. समोरील प्रांगणात भारताचा 'तिरंगा' डौलाने फडकत होता. स्टेडियममध्ये प्रेक्षकांची गर्दी होती. भारताचे ते 'प्रवेशद्वार' समोर दिसत होते. दोन्ही दारे बंद होती.

आपल्या सीमा गेटवर 'भारत' असे लिहिले


**आजी लक्ष्मी हरि मराठे**

**यांच्या स्मरणार्थ**



**प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

होते. त्याच गेटवर आपला ध्वज फडकत होता. पाकिस्तानच्या गेटवर त्यांचाही ध्वज फडकत होता. शालेय विद्यार्थी 'भारतमाता की जय', 'मेरा भारत अमर रहे' अशा प्रकारच्या घोषणा देत होते. 'सारे जहांसे अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' हलक्या आवाजात वाजवले जात होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकापासून वर्तमानकाळातील लष्करी सेवेतील अधिकाऱ्यांबद्दलचा अभिमान सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

इतक्यात 'ऑर्डर' व 'कमांड' चा आवाज कानी आला. सैन्यदलाचे ५ सैनिक अत्यंत कडक शिस्तीत आपल्या कडक युनिफॉर्ममध्ये समोर उभे होते. त्यांची मुद्रा करारी होती. आवाजात जरब होती. ऑर्डर देण्याची पद्धत, चालण्याची ज्ञान व शिस्त, चेहऱ्यावरील हावभाव सारे सारे बघण्यासारखे होते. असे ५ सैनिक ह्या कार्यक्रमासाठी राखीव ठेवलेले असतात. ह्यांपैकी एक एक सैनिक कडक शिस्तीत कवायत (परेड) करत येतो. गेटपर्यंत आल्यावर तेथेच उभा राहतो. गेट बरोबर ५ वाजता उघडतो. हे ५ सैनिक आपल्या अधिकाऱ्यांना ध्वज खाली घेण्याची परवानगी मागतात. अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यानंतर भारताचा ध्वज खाली घेतला जातो. त्यानंतर आदरपूर्वक त्याची घडी केली जाते. हेच ५ सैनिक तो ध्वज अत्यंत सन्मानपूर्वक आपल्या मुख्य स्थानाकडे घेऊन येतात. ध्वज खाली घेतला की त्याचवेळी बिगुल वाजवला जातो. या समारंभाला रिट्रीट म्हणतात. पुन्हा दुसऱ्या दिवशी सूर्योदयाबरोबर ध्वजारोहण होते. मात्र यावेळी दर्शक व इतर सरंजाम नसतो.

आपले जसे ५ सैनिक प्रत्येकी एक एक असे परेड करत गेटपर्यंत जातात तसेच पाकिस्तानचेही ५ सैनिक एक एक करत त्यांच्या गेटपर्यंत येतात. भारत व पाकिस्तानचे सैनिक एकमेकांसमोर उभे राहून आपल्या चेहऱ्यावरील हावभावावरून एकमेकांविषयी राग व तिरस्कार व्यक्त करतात. त्यांचाही ध्वज खाली घेऊन दोन्ही देशांची सीमा दारे (गेट) बंद केली जातात.

अत्यंत अभिमानाने व भारावलेल्या मनाने प्रत्येक दर्शक 'सारे जहांसे अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' ह्या ओळी मनात घोळवत परतते. आपली सीमा अत्यंत जबाबदार सैनिकांच्या हातात सुरक्षित आहे हेच परत एकदा प्रत्येकाला जाणवते. ***

# गुणवत्ता पारितोषिके आणि शैक्षणिक-वैद्यकीय मदत यांसाठी
## १५ ऑगस्ट पूर्वी अर्ज पाठवावे

**२००५-०६ मध्ये** १०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक स्पर्धा/परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

**१. कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिके -**

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत **मराठे परिवारांत सर्वाधिक गुण** मिळवणाऱ्यास **प्रत्येकी रु. २५०**

**२. सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिक -**

इ. १०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात **मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी** रु. १००

**३. प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक - रु. ५०० - पात्रतेचे निकष -**

i) तांत्रिक विषय घेऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण,

ii) ''१०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यांसारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याहि विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी,

iii) मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यांत यावा.

**४. कै. जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती - वार्षिक रु. २०००**

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.)

**५. शालिनी धुंडिराज** प्रायोजित **वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्माचा प्रचार यांसाठी** - वार्षिक पुरस्कार रु. १०००.

**६. शैक्षणिक कर्ज -**

**विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/ इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज १५ ऑगस्ट २००६ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे.** अर्ज फक्त २००५-०६ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत **अर्जाला जोडून** पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये.

**खास बक्षिस योजनेखाली** (हिंदी अथवा तांत्रिक विषय, ऑटो इंजि., वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्म प्रचार याबाबत) **अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.**

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.**

### शैक्षणिक, वैद्यकीय मदत

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीहि खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे. ***

# मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००७ चे निवेदन

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने २००६ सालची डायरी काढली. ही डायरी बहुतेक सर्वांनाच आवडली. डायरीची सुरवातीची माहिती खूपच उपयुक्त असल्याच्या अनेक प्रतिक्रिया आल्या. पृष्ठदानाची कल्पनाही कुलबांधवांना आवडली.

आता २००७ सालची डायरी काढण्याचा निश्चय पक्का केला आहे. या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार व रविवार सहित) पूर्ण पान असेल. पृष्ठदानाची कल्पनाही राबवली जाईल. ही डायरी ४०० पानांची असून त्यातील ३६५ पाने पृष्ठदानाची असतील. ३५ पानांमध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहिती व जाहिराती असतील. अनेक कुलबांधवांच्या सूचनेनुसार डायरीला गेल्या वर्षी प्रमाणे पुठ्ठयाचे कव्हर न घालता साधे कव्हर करून त्याला प्लॅस्टिक कव्हर किंवा लॅमिनेशन केलेले असेल.

यंदाही **पृष्ठदानासाठी १०० रु.** निश्चित केले आहेत. आपल्या स्वत:चा, मुलांचा, बायको, बहीण, भाऊ, आई, वडील यांचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. गेल्या वर्षीच्या डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही पुन्हा करण्यास काहीच हरकत नाही. लवकरात लवकर आपण पृष्ठदानाच्या तारखा कळवल्या म्हणजे त्याच दिवशीच्या पानावर घालता येतील. आपण तारखा कळवल्यानंतर रिकामी असेल तर त्या तारखेला नाहीतर त्याच्या जवळपास जी तारीख रिकामी असेल तेथे आपली खरी तारीख कंसात देऊन नाव, फोन, व्यवसाय/नोकरी - पद व वैशिष्ट्य छापले जाईल. यानुसार माहिती कळवून जास्तीत जास्त पृष्ठदानासाठी नोंदणी करावी.

डायरीमध्ये जाहिरात छापण्यासाठी दर पुढीलप्रमाणे आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १. | डायरीचे मलपृष्ठ रंगीत | ७००० रु. |
| २. | डायरीचे मुखपृष्ठ व मलपृष्ठाचे आतील पान रंगीत | ५००० रु. |
| ३. | रंगीत पूर्ण पान | ३५०० रु. |
| ४. | काळे पांढरे पूर्ण पान | ३००० रु. |
| ५. | काळे पांढरे अर्धे पान | १५०० रु. |
| ६. | काळे पांढरे पाव पान | ५०० रु. |
| ७. | शुभेच्छा पट्टी | ३०० रु. |
| ८. | पृष्ठदान | १०० रु. |

## 'वाडा' संस्कृति

आमच्या वेळी आम्ही वाड्यांत रहात होतो
होत्या चुली वेगळ्या परंतु एक कुटुंब होतो।।

दालने साऱ्या घरांची सर्वांस खुली होती
एकाही चौकटीस पडद्याची दोरी नव्हती।।

आनंद व्यथा दुसऱ्याची वाटून घेत होतो
दुखले खुपले कुणाला धावून जात होतो।।

काळ आता बदलला वाडे लयाला गेले
'बीएचके'च्या रूपांत फ्लॅट दिसू लागले।।

'अपार्टमेंट'च्या खुराड्यात सारे जगू लागले
आणि नावाप्रमाणे सारे 'अपार्ट' राहू लागले।।

शेजारी अगर समोरचा रहाता उभा पुढ्यांत
हॅलो करून त्याला निघती आपल्या घरांत।।

मदत लागणार नाही अशी तयांची खात्री
शब्दास महाग झाले कशी जमेल मैत्री?

येता प्रसंग बाका अथवा संकट समोर
कोणी न ये मदतीस असुनी शेजार।।

अपार्टमेंटचा धर्म जणू पाळला जातो
वाड्याची महती कळते, आम्ही वाड्यांत रहात होतो।।

- **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली

बाहेरगावच्या लोकांनी पृष्ठदान किंवा जाहिरातीचे पैसे पाठवताना शक्यतो ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने पाठवावे. चेकने बँकेत कमीशन खूप कापले जाते असा अनुभव आहे. मनिऑर्डरने पैसे पाठवल्यास आमच्याकडे जो भाग राहतो त्यावरही आपले पूर्ण नाव, पत्ता, रक्कम व तपशील लिहावा म्हणजे नोंदणी करणे सुलभ होते.

डायरीच्या सुरवातीच्या पानांतल्या माहितीत कोणत्या विषयांचा समावेश असावा, त्या विषयाची माहिती कोणाकडे मिळेल याबद्दल आपले विचार आणि आपल्या अन्य काही सूचना असतील तर त्याही कळवाव्या.

गेल्या वर्षी वेळेअभावी सर्व कुलबांधवांशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही. यावर्षी जास्तीत जास्त कुलबांधवांना डायरीमध्ये सहभागी होता यावे म्हणून हे निवेदन लवकर देत आहोत. तरी **आपण १५ ऑगस्ट पर्यंत पृष्ठदान, जाहिराती व आवश्यक माहिती पाठवावी** म्हणजे छपाईसाठी पुरेसा वेळ मिळू शकेल.

आपल्या ज्या कुलबांधवांकडे हितगुज जात नसेल त्यांनाही आपण वरील माहिती द्यावी अशी नम्र विनंती आहे.

लोभ आहेच वृद्धी व्हावी.

- **सौ. नीलांबरी रमेश**, पुणे

**संपर्क व पत्रव्यवहारासाठी पत्ता :-**

१. **सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र
६४२, नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर,
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०.
फोन : २४४५६२७०

२. **श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
१७५९ सदाशिव पेठ,
भिकारदास मारुती जवळ,
पुणे ४११ ०३०.
फोन : २४४७३२८१

३. **श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
त्रिवेणी नं. १, डेक्कन पाटबंधारे सोसायटी,
एस.एन.डी.टी. कॉलेज समोर,
एरंडवणे, सर्व्हे नं. ३६/९,
पुणे - ४११ ०३८
फोन : २५४६४७०६
मोबाईल : ९८२२७७७३६१

* * *

# आम्ही "वानप्रस्थी" - समाजसेवेचा आगळा अनुभव

- **मनोहर दामोदर** (पृ.२७५), अंबरनाथ

मित्रांनो, मी मनोहर दामोदर (वय ६७) व सौ. मालिनी म्हणजे आम्ही. तर काय की मी सेवानिवृत्त झाल्यानंतर वर्ष-दोन वर्षे आराम करून कंटाळा आला. प्रवास करून स्थळ दर्शन करावे तर तेही मनसोक्त आणि जवळ जवळ सर्व भारतवर्ष झालेले. मग विचार केला काही समाजसेवेसाठी देह झिजवत तर अनेक प्रकारे फायदाच होईल. मग आपल्या हितगुजमध्ये माहिती विचारली आपल्यापैकी काहींनी तत्परतेने दिली पण - मनासारखे काही सापडेना. एक दिवस जनकल्याण समिती (जकस) पुणे (RSS संचलित) ह्यांचे तर्फे सेवानिवृत्तांसाठी एक योजना वाचण्यात आली. रीतसर माहितीपत्रक भरुन पाठवले.

आमची 'चौकशी' झाली. प्रशिक्षणासाठी 'सोलापूरला या' असे पत्र आले. जाण्यासाठी आरक्षण केले अन् त्या अगोदर दोनच दिवस जातीय दंगलीमुळे संभ्रमात पडलो. 'कर्फ्यू' सुद्धा होता. पुण्याला फोन करून विचारले. 'प्रशिक्षण होणार' उत्तर. तसेच ठरल्याप्रमाणे निघालो. स्टेशनवर उतरण्याआधीच २ तास संचारबंदी उठली होती. कार्यालयात गेलो आणि अगदी थक्क झालो. सर्व व्यवस्था आखीव रेखीव - दगलीचा मागमूस कोणाच्या चेहऱ्यावर नव्हता तिथे. आम्ही (म्हणजे मी व सौ.) जाळपोळीच्या खुणा तर बाहेर पदोपदी बघितल्या होत्या. अनेक नामवंतांनी आम्हास रोज उपयुक्त माहिती दिली. सोलापूरकरांनी प्रत्येक गोष्ट जास्तीत जास्त उत्तम प्रकारे केलेली होती. खूप आनंद झाला. २६ जोडपी हजर होती प्रशिक्षण घ्यायला!

शेवटच्या दिवशी आमच्या अगोदरच्या काम करणाऱ्या सेवाव्रतींची आमची ओळख झाली. नवा हुरूप मिळाला. आम्हाला झलक म्हणून बारा भारतमाता मंदिर प्रकल्पांपैकी एक उत्तम असे मंदिर नदीहतरगा येथे आहे. तेथे नेऊन आणण्यात आले. (अनेक प्रकल्प जकस तर्फे चालवले जातात त्यापैकी 'भारतमाता मंदिर' प्रकल्प!) आम्ही परत अंबरनाथला येऊन आवश्यक गोष्टींची पूर्तता करून तुळशीच्या लग्नाचे दिवशी मंदिरात सेवेसाठी रुजू झालो. अन् काय लगेच ४ ठिकाणची बोलावणी तुळशीचे लग्न लावायला! मी खूष. दिलेल्या सूचनांवर हुकूम आम्ही वागायचा प्रयत्न केला आणि......

लक्षात आले की इथला समाज आळशी आहे. सर्व फुकट पाहिजे - भूकंपग्रस्त गाव असल्यामुळे खूप काही मिळाले. घरे बांधून मिळाली. आता कष्ट करायची तयारी नाही. जकस हॉस्पिटल जे मंदिराशेजारी आहे ते बंद आहे. फुकट चालवलेली बालवाडी ५ रु. महिना केला म्हणून बरं आहे. (मुलांना खायला सुद्धा रोजचे जकस तर्फे मिळत होते. सरकारी मदत नाही) थोडे परिचयांती लोकांनी काहीतरी करा (हॉस्पिटल, बालवाडी वगैरे) अशी गळ घातली. आम्ही ही गोष्ट आमच्यावर लक्ष देण्यासाठी ठेवलेल्या (जकसच्या) दोन जय-विजय बंधूना सांगितली. त्यांनी हे तुमच्या अखत्यारीतले प्रश्न नाहीत तुम्ही लक्ष देऊ नका असे सांगितले. त्यातला एक तर स्वत:ला प्रतिशिवाजी/हिंदूचा उद्धारक समजायचा. जेवणाचे ताट जो तो स्वत: उचले पण हे महाराज पडले ना? तसेच मंदिरावर लक्ष ठेवायला एक अस्सल मराठवाडी बेरकी म्हातारा ठेवला होता. त्याने सांगितले हे सेवाव्रती वगैरे काही नसतात. घरी लेकी-सुनांचे पटत नाही म्हणून इकडे येतात. चांगला संसारी मनुष्य इकडे मरायला येईलच कशाला? ऐकून गारच पडलो आम्ही! तर अशा रितीने कसं वागायचं?

शाळेत प्रयत्न करू म्हणून जि. प. शाळेत जाऊ लागलो तिथे तर आणखी मजा. ५वीच्या मुलाला मराठी वाचता येत नाही. १०वी च्या मुलाला ABCD येत नाही. मास्तुर शाळेत 'कंट्री' पितात. पत्ते खोळतात. मुख्य म्हणजे साधनांची कमतरता नाहीच अगदी Tape-Recorder संभाषण कॅसेट (English Teaching) खेळ साहित्य (जे मुले खराब करतील म्हणून देतच नाहीत) सर्व आहे. राजकारण गावात असतंच त्यामुळे शिक्षकांना जाब विचारायला कोणी आलाच तर विरोधी पार्टीचा आहेच बाजू घ्यायला. लातूरपासून अवघ्या ४०-४५ कि.मी. वर आहेत असली गावे. अन् लातूर Pattern चा केवढा दरारा.

असे जसे फिरलो, लोकांमध्ये मिसळलो तसे लक्षात आले की सर्व प्रकारच्या अवैध जीप वाहतूक करणारा एस.टी. च्या ड्रायव्हरला पॅसेंजर भरले म्हणून एस.टी. स्टँडवर चाकू चालवतो. खेड्यात कोणी मुली कधीही घराबाहेर पडत नाही त्यामुळे वयात आली की 'घरी' बस! मुलांचे मात्र खेळ वगैरे मी भारतमाता मंदिराच्या प्रांगणात घेत असे. त्यात दलित-मुस्लिम मुले पण असत. कदाचित नक्की माहित नाही पण ह्यामुळेच काही पुढाऱ्यांनी फूस देऊन आम्ही तेथे नसताना आमच्या हॉस्पिटलच्या सर्व काचा फोडल्या त्यामुळे तर आम्ही खूपच निराश झालो.

तसे खेडेगाव रहायला छान पण पाणी हा मोठा अडसर - कधी कधी पाण्यासाठी आम्हास २ कि.मी. जाऊन हंडे आणावे लागत. आम्हाला त्याची सवय नाही पण इतर बाबतीत मात्र खूपच प्रसन्न वातावरण होते. कोरडी हवा प्रदूषण विरहीत थोडा पाऊस पडत असला तरी व काही जणांच्या बोरवेलींना भरपूर पाणी मळे पिकवण्या इतपत! गावाचे नावच नदी हतरगा पण नदीत (तेरणा) पाणी नाही. हे मोठे मोठे कालवे बांधलेले - कधी काळी पाणी असेलही त्यात! झाडी तर अजिबात नाही. समुद्रासारखे लांबवर नजर टाकून बघता येते. अगदी संकष्टीचा चंद्रसुद्धा उगवताना पाहूनच आम्ही उपास सोडायचो. भाजीपाला फारसा नाही. पण होता तो ताजा! खूप प्रकारचे पक्षी मात्र मला बघायला मिळाले.

एकंदरीत जे काही 'समाजसेवा प्रबोधन' वगैरे असते ते असे एक वर्षाकरता राहून होऊच शकत नाही ह्या निष्कर्षाप्रत येऊन सर्व परिस्थितीची तपशीलवार माहिती पाठवून पाडव्याच्या दिवशी अंबरनाथला येण्यास निघालो. काम फारसे मनाप्रमाणे जमलेच नाही ही रुखरुख मनास लागली होती - पण इलाज नव्हता. पुनश्च हरी ॐ नंतर वाचा!

***

# गणिती करामती

- **जीवन सुहास मराठे** (पृ.८३), वय ११ वर्षे, मराठे वाडा, ४२६१, ब्राह्मणपुरी, शक्ती डेअरीजवळ, मिरज,
जि. सांगली ४१६ ४१० फोन : (०२३३) २२२ ३२३८

## २००६ ह्या नववर्षाच्या संख्यात्मक शुभेच्छा देण्यासाठी केलेली गणिती करामत

**(अ) १ ते ९ अंकापैकी प्रत्येक अंक ९ वेळा वापरून**

★ $\left(\dfrac{1}{\cdot 1 \times \cdot 1 \times \cdot 1} + 1 + 1 + 1\right)(1 + 1) = 2006$

★ $\dfrac{(2 \times 2)^2}{\cdot 2 \times \cdot 2 \times \cdot 2} + 2 + 2 + 2 = 2006$

★ $\dfrac{(3 \times 3)(3 + 3)}{\cdot 3 \times \cdot 3 \times \cdot 3} + 3 + 3 = 2006$

★ $333 \times (3 + 3) + (3 \times 3) - (3 \div 3) = 2006$

★ $\dfrac{(4 \times 4)(4 + 4)}{\cdot 4 \times \cdot 4 \times \cdot 4} + 4 + \sqrt{4} = 2006$

★ $[(4 \times 4 \times 4 \times 4) - 4] \times (4 \times \sqrt{4}) - \dfrac{4}{\cdot 4} = 2006$

★ $[(5 + 5 + 5) \times 5 + 5] \times 5 \times 5 + (5! \times 5\%) = 2006$

★ $\dfrac{(5 \times 5)(5 + 5)}{\cdot 5 \times \cdot 5 \times \cdot 5} + (5! \times 5\%) = 2006$

★ $\dfrac{(6 \times 6)(6 + 6)}{\cdot 6 \times \cdot 6 \times \cdot 6} + \sqrt{6 \times 6} = 2006$

★ $\{[(7 \times 7 - 7) \times 7] - 7\} \times 7 - \dfrac{7}{\cdot 7} + 7 = 2006$

★ $[(8 \times 8) \times \sqrt{8 + 8} - \sqrt{8 + 8}] \times 8 - \dfrac{8}{\cdot 8} = 2006$

★ $999 + 999 + 9 - (9 \div 9) = 2006$

★ $\dfrac{(9 \times 9)(9 + 9)}{\cdot 9 \times \cdot 9 \times \cdot 9} + \sqrt{9} + \sqrt{9} = 2006$

**(ब) प्रत्येक अंक एकदाच वापरून**

★ $(3 \times 6!) - 5! - 4! - (9 + 2) + (8 - 7) = 2006$

★ $\dfrac{2}{\cdot 1\%} - (3 + 4 + 5 + 6) + (7 + 8 + 9) = 2006$

## हिंदू नववर्ष शके १९२८ च्या संख्यात्मक शुभेच्छा देण्यासाठी केलेली गणिती करामत

**(अ) १ ते ९ अंक क्रमाने एकदाच वापरून**

★ $\frac{2}{\cdot 1\%} - \{ [ -(3+4+5) + (6+7) ] \times (8 \times 9) \} = 1928$

**(ब) १ ते ९ अंकापैकी प्रत्येक अंक ९ वेळा वापरून**

★ $\frac{1+1}{\cdot 1\%} - [ (1+1+1)! \times (11+1) ] = 1928$

★ $\frac{2 \times 2}{\cdot 2\%} - \left[ (2 \times 2) \times \left( \frac{2 \times 2}{\cdot 2} - 2 \right) \right] = 1928$

★ $\frac{3+3}{\cdot 3\%} - [ (3 \times 3 \times 3 \times 3) - (3 \times 3) = 1928$

★ $(444 \times 4) + \{ [ (4 + \sqrt{4})^{\sqrt{4}} + \sqrt{4} ] \times 4 \} = 1928$

★ $\frac{5+5}{\cdot 5\%} - [ (5 + \frac{5}{5}) \times [5! \times (5+5)\% ] \} = 1928$

★ $\frac{6+6}{\cdot 6\%} - (6 \times 6 + 6 \times 6) \times (6 \div 6) = 1928$

★ $\frac{7+7}{\cdot 7\%} - \left( \frac{7}{\cdot 7} \times 7 \right) - \left( \frac{7+7}{\cdot 7\%} \right) = 1928$

★ $\left[ \frac{8 \times 8 \times 8}{\cdot 8} \times \frac{(8+8+8)}{\cdot 8} \right] + 8 = 1928$

★ $(\sqrt{9} + \sqrt{9})^{\sqrt{9}} \times 9 - \{ (\sqrt{9} + \sqrt{9} + 9) + (9 \div 9) \} = 1928$

★ $[44 \times (44 \div 4)] \times 4 - [\sqrt{4} + \sqrt{4} + 4] = 1928$

★ $\left( \frac{88}{8} \times 88 \right) \left( \frac{8+8}{8} \right) - 8 = 1928$

★ $(6 \times 6 \times 6 \times 6) + 6! + 6 + 6 - \frac{6}{6\%} = 1928$

## जीवनची बहीण वैशाली, वय वर्षे १४, हिनेहि केलेल्या गणिती करामती

★ $(22 \times 22) \times 2^2 - (2 \times 2 \times 2) = 1928$

★ $[ (44 \times 44) - (\sqrt{4} + \sqrt{4} + 4) ] \div (4 \div 4) = 1928$

★ $\left[ \left\{ \frac{88}{8} \times \frac{88}{8} \times (8+8) \right\} - 8 \right] = 1928$

पुण्यांतले कुलबांधव गजानन चिंतामण यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ कुलबांधवांसाठी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचा निकाल मार्च २००६ च्या अंकांत प्रसिद्ध केला आहे.

स्पर्धेतील पारितोषिक-पात्र हस्ताक्षर कुलबांधवांना पाहता यावे, त्यामुळे त्यांनाहि चांगले लिहिण्याची स्फूर्ति मिळावी या हेतूने प्रथम पारितोषिक विजेत्या दोन स्पर्धकांची हस्ताक्षरे प्रतिष्ठानचे कार्यवाह मोहन सदाशिव यांनी प्रायोजित केल्यामुळे ती येथे छापली आहेत. - संपादक

॥ श्री ॥

चिंतामणि बळवंत हस्ताक्षर स्पर्धा.

माझे वडील कै. चिंतामणि बळवंत (पृ.१२८) हे स्थापनेपासून १९८९ सालापर्यंत पुणे शाखेचे कार्य करत होते. त्यांचे १९९४ साली निधन झाले, त्यांच्या स्मरणार्थ मी प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलैमध्ये (जन्मदिनी व स्मरणदिनी) शिक्षण निधीकरता प्रतिष्ठानकडे देणगी देत असतो.

माझ्या वडिलांचे हस्ताक्षर चांगले होते. चांगल्या हस्ताक्षराचे ते कायमच कौतुक करत असत. त्यांच्या स्मरणार्थ मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेतर्फे त्यांच्या नावे दरवर्षी जानेवारीमध्ये हस्ताक्षरस्पर्धा आयोजित करण्याची इच्छा आहे. स्पर्धेला वयाची अट नाही. स्पर्धकांनी मराठी अथवा इंग्रजी हस्ताक्षर १० ओळी स्पर्धेकरता माझ्या घरच्या पत्त्यावर अथवा मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेकडे ३१.०१.२००६ च्या आत पाठवणे.

वरील स्पर्धेचा निकाल हितगुज मार्चच्या अंकात जाहीर केला जाईल. बक्षिसे पोस्टाने पाठवली जातील. उत्कृष्ट हस्ताक्षरास पहिले बक्षीस रु.२५०, दुसरे बक्षीस रु.१५० व तिसरे बक्षीस रु.१००.

गजानन चिंतामणि मराठे, प्लॉट नं. ३४ अ, 'सार्थक', सेनादत्त कॉलनी,
पुणे ४११०३०. फोन : २४३३१६५१

स्पर्धकाचे नाव — सौ. शालिनी ना. जाईल.

१२, साधना सदन, नौपाडा हायवे सोसा., एस.व्ही.रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२

## हस्ताक्षर स्पर्धेसाठी

अमृताशी पैजा जिंकणारी अक्षरे कुणी निर्माण केली? हे एक न सुटलेलं कोडं आहे. त्याचं उत्तर त्या शब्दातच सापडेल. 'क्षर' म्हणजे नाश पावणे आणि म्हणून जे नाश पावत नाही ते 'अक्षर'... अनादि - अनंत! असं म्हणतात या चराचर जीवसृष्टीची निर्मिती ब्रह्मदेवाने केली. त्यापूर्वी त्याने ध्वनी निर्माण केला; ज्याने अनंताला व्यापून टाकलं. ध्वनीच्या विविध अविष्कारातून ब्रह्मदेवाच्या मुखातून दिव्य असे वेद, शास्त्र, पुराण, ऋचा, उपनिषदे बाहेर पडले. ते महर्षी व्यासांनी ऐकले. जसे ऐकले तसे त्यांचा शिष्योत्तम श्री गणेशाला सांगितले. त्याच बरोबर ते सगळ्यांना सांगण्याची आज्ञा केली. जो समोर बसून श्रवण करेल त्याला लाभ मग इतरांचं काय? आणि मग 'नादब्रह्मा'लाच आत्मरूप म्हणजे स्वतःचेच रूप बहाल केलं ते श्री गणेशाचं डोळ्याला दिसणारं सृष्टीचं पहिलं शब्दब्रह्म 'ॐ': श्री गणेशापाठोपाठ श्री शारदेचं, वाग्विलासिनी सरस्वतीचं शब्दरूप 'श्री' रूपानं प्रकटलं. अशा या 'ॐ' आणि 'श्री' शब्दरूपाला देवनागरी लिपीचे जनक - जन्मदाते - मायबाप असे म्हणतात.

सौ. सुरेखा सुहास मराठे.
घराणे वाडे-पडेल (९वे)
सुहास बळवंत मराठे
(ग. क्र. २२)

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** (डिसेंबर २००४ पासून क्रमाक्रमाने हितगुज वर्गणीदारांचे पत्ते देण्यात येतात. मुंबईच्या उरलेल्या पश्चिम उपनगरातील पत्ते या अंकांत दिले आहेत. आता फक्त पुणे जिल्ह्यातले पत्ते राहिले आहेत ते यापुढील अंकात.)

२६२३१०६२/२८२४/४७७/३७८
श्रीकांत धुंडीराज मराठे
३/४१, जुहू दर्शन, न्यू डी. एन. नगर,
**अंधेरी (प.)**, मुंबई ४०० ०५८.

२८५९/५२७/८६४
नारायण विश्वनाथ विद्वांस
रामलोचन चाळ, बांद्रेकर वाडी,
**जोगेश्वरी (पूर्व)**, मुंबई ४०० ०६०.

२८३२१२८०/२९६०/६७५/४०१
सौ. सुचेता रमेश जोशी
पुष्पकुंज, तळमजला, नटवर नगर रोड नं. ३,
**जोगेश्वरी (पूर्व)**, मुंबई ४०० ०६०.

२८२६९४०२/२५८०/६८/५०३
पुष्कराज वामन मराठे
ए-१/७०१, सुखसागर क्लासिक, समर्थ नगर,
माजसवाडी, **जोगेश्वरी (पूर्व)**, मुंबई ४०० ०६०.

२८३७१३६४/२२९६/१२५/३७५
नरहरी महादेव मराठे
बी ६, मधुवन देसाई चाळ. ठाकूर मार्ग,
**जोगेश्वरी (पूर्व)**. मुंबई ४०० ०६०.

५६२३१३२६/१३०५/६०७/७३१
सुधीर विश्वनाथ चक्रदेव
डी-४०५ धीरज दर्शन, एम.डी.पी. रोड,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०६०.

३१९७/८८३/०१९
रवी गोविंद मराठे
डी-५०३, ग्रेसी लॉन अपार्टमेंट, आरे रोड,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२८७४८२२२/XXXM/६४१/३५९
सौ. सुधा वसंतराव मंडलीक
उदय सोसायटी, महालक्ष्मी समोर, आरे रोड,
**गोरेगांव (प.)**, मुंबई ४०० ०६२.

२८७४२४७४/३१७८/५८४/७०४
सौ. गीता सुधाकर पेठे
गोपिका निवास, दळवी वाडी, आरे रोड,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२८७३११६२/XXXXM/६९९/७३०
डॉ. साधना शिदोरे
कृष्णकुंज, जयप्रकाश नगर,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२८४१००२४/२६६७/३१८/३६६
सौ. सुजाता (मंगला) श्रीकृष्ण जोशी
ब्लॉक १, के/२, यशोधाम सोसायटी, दिंडोशी बस डेपो,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२८७३६१०८/२००३/१८४/३६१
प्रवीण प्रभाकर मराठे
१०/४३, न्यू भाग्यश्री, एल. टी. ३रा रोड,
म. गांधी मार्ग, **गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२७८८/४०३/३६२
गोपाळ कमलकांत मराठे
भीमा टोपीवाला चाळ, केशव गोरे मार्ग,
**गोरेगांव (प.)**, मुंबई ४०० ०६२.

२८७६४७८८/२८८०/५४७/६७६
निलेश सदानंद खांबेटे
१/५ चैतन्य सोसायटी, आरे रोड, पेरू बाग,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२७८७/४०२/४०७
गोविंद गणेश मराठे
६, सुखसदन, गोगटे वाडी रोड, सन्मित्र शाळेजवळ,
**गोरेगांव (पूर्व)**, मुंबई ४०० ०६३.

२८७६५११९/२८३२/४९४/४३९
दत्तात्रय गणेश मराठे
जगन्नाथ निवास, रुम नं. ११, श्रेयस कॉलनी,
आरे रोड नं. २, **गोरेगांव (पूर्व)**, **मुंबई** ४०० ०६३.

२८७६९८२७/३२४८/९२३/२८८
सौ. माधवी श्रीकृष्ण मराठे
ए-२, हाय राईझ, ११ परिमल नगर,
**गोरेगांव (प.)**, मुंबई ४०० ०६२.

२८४१२७५७/२४७२/२६/३२५
अनंत नारायण मराठे
९, सिताकुंज, उद्यामकुंज सोसायटी, राणी सती मार्ग,
मालवणकर वाडी, **मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८८९१०७६/२५९६/२७/४८७
विश्वास माधव मराठे
आदर्श मंदिर, संगीता सिनेमाच्या बाजूला,
दत्त मंदिर रोड, **मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८८२६१०९/३०२०/७२५/०३२
दिनकर वासुदेव मराठे
ई-१२, पुष्पा हाऊसिंग कॉलनी, दफ्तरी रोड,
**मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८४९०७२९/२८४०/५०८/४३७
बाळकृष्ण विष्णू मराठे
सुशिला निवास, रुम नं. ४, कुरार व्हिलेज,
कुरार, **मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८८१०१६२/३०१७/७२८/६९३
रमेश जनार्दन खांबेटे
सभाकुंज नं. ४, १ला मजला, रुम नं. १,
ब्राह्मणसभेजवळ, **मालाड (प.)**, मुंबई ४०० ०६४.

२८८०२४१८/८९०४/२५९७/२८/०८७
नरहरी गोविंद मराठे
ए/३०२, हितेंद्र निवास, डॉ. पन्नालाल घोष मार्ग,
सोमवार बाजार, **मालाड (प.)**, मुंबई ४०० ०६४.

२८४०१०६३/२१९६/२०१/३२५
विश्वनाथ नारायण मराठे
१२, उदयकुंज सोसायटी, राणी सती मार्ग,
मालवणकर वाडी, **मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८८९१०७६/PPPP/९९०९/४८७
माधव रामकृष्ण मराठे
जोशी हाऊस, संगीता सिनेमाच्या बाजूला,
**मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८७७८६३९/२३४२/२५/३२५
राजाराम नारायण मराठे
१४, उदयकुंज सोसायटी, राणी सती मार्ग,
मालवणकर वाडी, **मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८४२६१९४/२७१०/२८२/१६९
रविंद्र दिनकर मराठे
बी-३ व्हॅलॅंटाईन अपार्टमेंट, अरुणकुमार वैद्य मार्ग,
**मालाड (पूर्व)**, मुंबई ४०० ०९७.

२८७४२९०३/२५९२/५८२/६४५
बळवंत गणेश विद्वांस
बी-५, आदित्य अपार्टमेंट, चिंचोली बंदर रोड,
**मालाड (प.)**, मुंबई ४०० ०६४.

२८३३३९९७/२३१३/३९६/१८१
बल्लाळ रामचंद्र मराठे
बी ४०१, हेमलता अपार्टमेंट, सेव्हन स्टार समोर,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८०१३३६३/२३६३/३९२/७४७
रामचंद्र पुरुषोत्तम जोशी
२/१८, भावे बिल्डींग, डॉन बॉस्को शाळेजवळ,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८९८१६६८/३०२५/७४२/७४७
सौ. संजीवनी शरद जोशी
८, मातृकृपा, रत्नगंधा सोसा., डॉन बॉस्को शाळेजवळ,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८०८८४३९/२१२२/२९३/१४९
श्रीराम यशवंत मराठे
बी/७, स्वाती, ३रा मजला, चंदावरकर क्रॉस रोड नं १,
**बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९२.

२८६३६७७०/२२१७/१४८/०२४
विनायक विष्णु खांबेटे
स्मितांजली सोसायटी, कोरा केंद्रासमोर,
**बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९२.

२८१२४०५२/३०२७/७४४/७४७
सौ. अनुराधा आनंद कट्टी
१, कर्मयोग सोसायटी, एल. टी. रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८६१७०८१/२४९९/२९७/६४८
जयंत श्रीधर विद्वांस
३ए/७०, योगानंद सोसायटी नं. ४, परांजपे रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८६१६६७४/२७६१/३६५/०४२
वसंत गणेश मराठे
४ ए/१४२, भक्तीयोग सोसायटी, परांजपे रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८९३०७१९/२२३०/१२/२९०
अरुण गणेश मराठे
बिल्डींग ए/६/११, फ्लॅट ४९, सावंत सदन,
जीवन बीमा नगर, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० १०३.

२८९३२४४७/२७७७/३९१/७२७
विश्वास द्वारकानाथ चक्रदेव
ए-६/६, फ्लॅट २६, जीवन शांती नगर,
**बोरीवली (प.)**, मुंबई ४०० १०३.

२३०६४३४६/२५७५/४२९/३४२
सौ. मंगला ललितकुमार मेहेंदळे
ए/१७, मेघना अपार्टमेंटस्, परांजपे रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८०८७७५२/२७८०/३९४/७४७
सविंद्र रामचंद्र जोशी
गणेश दया भुवन, डॉन बॉस्को शाळेजवळ,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८९८८८६३/३०२६/७४३/७४७
सौ. शर्वरी शरद वैद्य
१५, छाया, लक्ष्मण नगर, डॉन बॉस्को शाळेजवळ,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८३३१३९७/२८५५/५२०/१९
सुहास श्रीधर मराठे
ए-१०५, जयकामाक्षी सोसायटी, जयराज नगर,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८६२६६७५/२४४४/२५१/४६९
दिलीप आत्माराम मराठे
७/२६, जवाहर सोसायटी, गोविंद नगर,
**बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९२.

२८१५९१८१/२७५६/३५९/३७७
विश्वास भालचंद्र मराठे
३५/ए-२, मंडपेश्वर कृपा सोसायटी,
मंडपेश्वर रोड, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९२.

२८६५१२३३/ZZZ/९१२०/७४७
श्रीमती शुभदा पांडुरंग जोशी
रुम नं. ३, सामंत बिल्डींग, एल. टी. रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८६१३६८८/२२८७/२४४/०९१
सुधाकर विष्णु मराठे
८ए/२७१, योगानंद सोसायटी, परांजपे रोड,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८०११५७२/२३१८/२९९/२२७
शरदचंद्र त्र्यंबक फडणीस
४/११९, योगानंद सोसायटी नं. ४,
वझिरा नाका, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० ०९१.

२८६२४४९८/२७७९/३६३/३३७
शरद कृष्णाजी मराठे
ए/००२, शशांक सोसायटी, नवचैतन्य प्रकाशन,
एक्सर रोड, **बोरीवली (प.)**, मुंबई ४०० १०३.

८९७००७८/२७५८/३६१/७३१
सुधीर कृष्णाजी चक्रदेव
१७१, कृष्ण कमळ, अभिनव नगर,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

२६०२/५१/०४४
विद्याधर दत्तात्रय मराठे
२०३, सिद्धेश सोसायटी, कोटक मंदिराच्या बाजूला,
दत्तपाडा, **बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

८६४३८२०/२७८३/३९९/३४१
अविनाश केशव मराठे
ए/२, सामवेद, राजेंद्र नगर,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

८९७६००५/३१९१/८७६/०८७
सौ. स्नेहल प्रसाद आठवले
बी-१८, साई स्मृती, नॅन्सी कॉलनी जवळ,
संत ज्ञानेश्वर मार्ग, **बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

८९२८५८९/२७६०/३६४/२७९
रविंद्र वामन मराठे
९५, गणेश सदन, श्रीकृष्ण नगर रोड नं. ६,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

८०८९११३/२७५९/३६२/२२८
मुकुंद त्र्यंबक फडणीस (मराठे)
डी-४, गायत्री अपार्टमेंटस्, लक्ष्मी नगर, कार्टर रोड ३,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

२८०६०२४१/२८८५/५६२/६७०
सौ. अर्चना (रोहिणी) अशोक साठे
२९३, साठे हाऊस, बी/७, दत्तपाडा रोड,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

२८९३६३०५/२१३१/३५८/४०८
दिलीप वसंत मराठे
४४, श्री समर्थ सदन, श्रीकृष्ण नगर रोड नं. ३,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

२९४९/६८२/६९८८
विद्याधर अनंत खांबेटे
फ्लॅट १०५, बिल्डींग नं. ६, दि डिस्कव्हरी,
दत्तपाडा रोड, **बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

८९३९९६८/२१८२/२४/४८७
वसंत कृष्ण मराठे
प्लॉट १३८, युनिट ५, अभिनव नगर,
**बोरीवली (पूर्व)**, मुंबई ४०० ०६६.

२८६३१५२७/२८५६/५२१/०१९
सतीश श्रीधर मराठे
जी-३०३, निसर्ग, ९० फिट रोड, महावीर नगर,
**कांदिवली (प.)**, मुंबई ४०० ०६७.

२८०८२८११/५००५/१५८/६२५
नीळकंठ (विलास) बाळकृष्ण विद्वांस
१४, मराठी अस्मिता सोसायटी, २२ आरडीपी (१),
सेक्टर २, चारकोप, **कांदिवली (प.)**, मुंबई ४०० ०६७.

३१०९/७९८/६९५
सौ. अलका उदय बेलापूरकर
ठाकूर व्हिलेज,
**कांदिवली (प.)**, मुंबई ४०० १०१.

२८६९४९६१/२०१२/२९१/२२०
माधव परशुराम मराठे
बी-४०२, मित-नयन सोसायटी, गणेश नगर,
लिंक रोड, **कांदिवली (प.)**, मुंबई ४०० ०६७.

२८८४१८५६/२८०६/४३३/२७९
सुधाकर वामन मराठे
३९/ए, अनामिक सोसायटी, आकुर्ली क्रॉस रोड १,
आर्य चाणक्य नगर, **कांदिवली (प.)**, मुंबई ४०० ०६७.

२८०८३६५१/२८७८/५११/१३४
संग्राम अशोक मराठे
सी-८०२, एकता भूमी, महावीर नगर,
कांदिवली (प.), मुंबई ४०० ०६७.

२८७६४२७६/२४४७/९१०/३६५
श्री. सुरेश भिकाजी मराठे
'बी' विंग, ८ ओम गीतांजली, सुहासिनी पावसकर मार्ग,
वैशालीनगर, **दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

२०७१/६०९/५३४
विश्वनाथ काशिनाथ मराठे
ए-१०३, सूर्योदय बिल्डींग, रावळपाडा,
**दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

२२०८६९७५/२०८२/२०/६९९
गणेश मोरेश्वर खांबेटे
बी/२, गणेशप्रसाद सोसायटी, लक्ष्मण म्हात्रे रोड,
**दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

२८९३४४४१/८९१२/२९७४/६०५/०१७
शैलेंद्र भास्कर मराठे
ए/२०६, शफी सोसायटी, राजाराम तावडे रोड,
म्हात्रे वाडी, **दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

२८९२६२३२/२७८४/४००/२३१
ओमकारनाथ गणेश मराठे
स्वेदगंगा, बी-२/१७, आनंद नगर जवळ,
छ. शिवाजी मार्ग, **दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

२८९३१८२३/२७५७/३६०/६९९
सतिश गणेश खांबेटे
बी/२, गणेशप्रसाद सोसायटी, लक्ष्मण म्हात्रे रोड,
**दहिसर (पूर्व)**, मुंबई ४०० ०६८.

## या अंकात


१. ५० अंकांची नॉन-स्टॉप वाटचाल - यापुढे काय?.. पृ.१
लक्ष्मण शंकर मराठे, मुलुंड, संपादक, हितगुज

२. मधुसूदन खांबेटे - बहुआयामी व्यक्तिमत्त्व......... पृ.१
महाराष्ट्र टाईम्सवरून - प्रेषक, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, मुंबई

३. मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिके २००४-२००५.. पृ.४

४. तारणाऱ्यापेक्षा मारणारा ठरला श्रेष्ठ (कविता)..... पृ.५
सौ. प्रतिभा प्रभाकर मराठे, नौपाडा, ठाणे

५. मामा मराठे ब्रिज स्पर्धा - १८ जून २००६......... पृ.५

६. अमृतसर व वाघा बॉर्डर दर्शन..................... पृ.६
मीना यशवंत मराठे, पुणे

७. गुणवत्ता पारितोषिके आणि शैक्षणिक-वैद्यकीय मदत यांसाठी १५ ऑग्सट पूर्वी अर्ज पाठवावे........... पृ.७

८. मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००७ चे निवेदन........ पृ.८
सौ. नीलांबरी रमेश मराठे, पुणे

९. 'वाडा' संस्कृति (कविता)........................ पृ.८
विठ्ठल महादेव मराठे, सांगली

१०. आम्ही ''वानप्रस्थी'' - समाजसेवेचा आगळा अनुभव.... पृ.९
मनोहर दामोदर मराठे, अंबरनाथ

११. गणिती करामती............................ पृ.१०,११
जीवन सुहास मराठे आणि वैशाली सुहास मराठे, मिरज

१२. कै. चिंतामण बळवंत हस्ताक्षर स्पर्धेतील प्रथम पारितोषिक विजेत्या दोन स्पर्धकांची हस्ताक्षरे............ पृ.१२,१३
सौ. शालिनी ना. जाईल, ठाणे आणि सौ. सुरेखा सुहास मराठे, मिरज

१३. हितगुज वर्गणीदारांचे पत्ते - मुंबई उरलेली पश्चिम उपनगरे..................... पृ.१४,१५


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३ ते ५), आणि **प्रतिसाद** (पृ.३) **ही नेहमीची सदरे.**

**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)